क्रमांक कॉन/दुरुस्ती योजना
पुणे. दिनांक १५/९/७६.

एकत्रीकरण अधिकारी, सर्व.

विषय :- जमिन एकत्रीकरण योजना
का.क.३२[१] अन्वये दुरुस्ती योजनेबाबत----

आपले कार्यालयाकडुन प्राप्त होणारे दुरुस्ती योजना प्रस्ताव त्यातील त्रुटीची पुर्तता करण्यासाठी बव्हंशाने परत करावे लागतात. प्रकरणी चौकशीस प्रथमच विलंब झालेला असतो व त्रुटीचे पुर्ततेसाठी या : कांधात आणावा भारव पडते. आता दुरुस्ती योजना नमुना पुर्णतया ठरवुन गेला असल्याने त्याच त्या त्रुटीची पुनरावृत्ती होणे इष्ट नाही. यादृष्टीने दुरुस्ती योजना प्रस्ताव सादर करतांना किमानपक्षी खालील मुद्यांचे कागदपत्र तयार करुन ते योग्य असलेबद्दल आपले कार्यालयांतील प्रकरण छाननी वेळी खात्री करुन तशा अर्थी आपला अभिप्राय प्रतिवेदनात देण्याची पध्दती ठेवावी.

१. [अ] प्रस्ताव सर्वसंमत असल्यास दुरुस्ती योजनेशी संबंधित सर्व खातेदार यांची संमती पत्रावर स्वाक्षरी असलेली खात्री करावी. सर्व स्वाक्षरी असल्यास मूळ खातेदार यांचे अधिकार पत्र प्रकरणी सामील करावे. दुरुस्तीमुळे कमी होणारे क्षेत्राची संबंधी खातेदार ह्यांना स्पष्ट कल्पना देवुन जबाबात तशा अर्थी उल्लेख करावा अथवा स्वतंत्र जबाब नोंदवावा.

[ब] एकादे खात्याची दुरुस्ती नाईलाजाने किंमतीवर करावी लागली तर योजनेतील असमतोल बदल नाहीसे करण्यासाठी सुचविलेल्या दुरुस्तीमुळे समतोल मोबदले झालेचे स्पष्टीकरणार्थ जमिनीचे पीक पहाणीतील उत्पन्न मानान्वये किंमती पत्रक प्रकरणी सामील करुन तत्संबंधी स्पष्ट अभिप्राय हरकत पत्रकी नमुद करण्याची पध्दत ठेवावी.

[क] दुरुस्तीमुळे फेरबदल होणाऱ्या जमिनीत खातेदारांना सुधारणा केल्या आहेत अगर कसे याची खात्री करुन तसाबाबत अभिप्राय हरकत पत्रकी देणे जरुर आहे. विशेषात: मूळ जमिनी कायम ठेवण्याचे प्रस्तावावेळी या मुद्याची बारकाईने पहाणी/चौकशी होणे जरुर आहे.

२. योजना सदोष असल्यासच त्यांत दुरुस्ती करण्याचा तरतूद का.क.३२ यात असलेने मूळ योजना सदोष होती हे सिध्द करणे जरुर आहे. त्या दृष्टीने हरकत पत्रकात पुढील स्पष्टीकरणाची आवश्यकता असते.

अ. योजनेतील दोषांची मिमांसा.

ब. संभाव्य दुरुस्तीमुळे जमिनीच्या झालेल्या फेर बदलाने सदर दोष नाहीसा होतो, त्याचे स्पष्टीकरण.

क. संभाव्य दुरुस्तीतील जमिनीची तबदिली कशी समतोल आहे याचे स्पष्टीकरण.

३. इकडील परिपत्रक क्र. स्लू. आर. ३४ दि. १९/९/७० ने विहित केलेली माहिती/पत्रके प्रकरणी सामील केल्याची खात्री करुन योजनेपुर्वी/योजनेप्रमाणे व संभाव्य दुरुस्तीदर्शक नकाशे सर्व्हे नंबर / हिस्सा नंबरत्यांच्या हद्दी व गट नंबर दर्शक असा नकाशा[रंग टीपा सह] प्रकरणी सामील करावा. तसेच संभाव्य दुरुस्ती दर्शक नि.१[३][४] नमुन्यात माहिती प्रकरणी सामील असल्याची खात्री करावी.

४. जमिनीचे पत्रक [आली गेली]योग्य रितीने खातेदार तयार करुन ते मेळात असलेबद्दल सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांनी खात्री करुन तशा अर्थी शेरा पत्रकावर ठेवण्याची पध्दती ठेवावी व त्याची खात्री प्रकरण सादर करणेपुर्वी आपले कार्यालयात करावी.

५. योजनेपुर्वीच्या जमिनी कायम ठेवुन दुरुस्ती योजनेचा प्रस्ताव सादर केला गेला जातो. वस्तुत: गट संख्या न वाढेल अशी दुरुस्ती सुचविण्याबाबत एकत्रिकरण अधिकारी यांनी कसोशीने प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. विशिष्ट अटल अडचणीमुळे गट संख्येत वाढ करणे क्रम प्राप्त झाल्यास त्याचे समर्थनार्थ हरकत पत्रकात स्पष्टपणे अभिप्राय द्यावा अशा वेळी जंगल स्थितीदर्शक टीपा असलेला सात नकाशा प्रकरणी सामील करावा व गट संख्या न वाढविता कोणकोणते पर्याय अर्जदार व संबंधित खातेदार यांना समजाऊन सांगितले याबाबतचा खुलासा प्रतिवेदनात करावा.

६. मोजणी चुकीमुळे योजनेत दुरुस्ती करणे क्रमप्राप्त झाल्यास मुख्यत्व पुढील बाबींचा विचार करणे जरुर आहे.

अ] नव्याने केलेल्या मोजणीची जंगल तपासणी सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांनी करुन तसा अर्थी शेरा मोजणी नकाशावर ठेवणे जरुर आहे.

ब] क्षेत्रातील संभाव्य फरकाची कल्पना संबंधी खातेदारांना देऊन त्यात त्यांची लेखी संमती घेणे जरुर आहे.

~~ब] क्षेत्रातील संभाव्य फरकाची कल्पना संबंधी खातेदारांना देऊन त्यात त्यांची लेखी संमती घेणे जरुर आहे.~~

क] क्षेत्रातील दुरुस्तीत एखादे खातेदाराने संमती न दिल्यास मोजणीबाबत हि.फा. नं. २ भरुन त्यामधील रकाना क्रमांक ६ मध्ये निर्णय नोंदवून त्याखाली सही करावी. तसेच अशा प्रकरणी महाराष्ट्र महसूल जमिन महसूल कायदा १९६६ अन्वये वारसाची नोंद गा. न. नं. ६ यांत घेऊन सदर नोंदीस तक्रार गृहीत धरुन तक्रारी बाबत तक्रारी रजिष्टरी नोंद घेऊन व निर्णय देऊन कायम झालेल्या ७/१२ व

व तक्रारी रजि. उतारा व हि.फार्म २ चा उतारा प्रकरणी सामील ठेवावा.

ड] मोजणी चुकीस जबाबदार कर्मचारी यांचे स्पष्टीकरण घेऊन जरूर त्या अभिप्रायासह प्रकरण स्वतंत्ररित्या उपसंचालक यांचेकडे कारवाईसाठ पाठवावें.

७. दुरुस्ती योजनेस आदेश देतांना अथवा प्रसिध्दी आदेश देताना प्रकरणी विलंब टाळण्याचे दृष्टीने कांही मुदयांची पुर्तता करण्या बद्दल इकडील पत्रात सुचना देण्यांत येतात त्याची पुर्णपणे पुर्तता झालेची खात्री वेळीच आपले कार्यालयात होणे आवश्यक आहे. प्रकरण इकडे फेर सादर करतांना या मुदयांची पुर्तता झाली असलेबद्दल आपले प्रतिवेदनात निश्चितपणे खुलासा करावा.

प्रकरणी दुरुस्ती योजना प्रस्ताव सादर करतांना आपले कार्यालयातील प्रकरण छाननी वेळी तेथील मुदयांवर परिपुर्ण असल्याची खात्री करुन व तसा अर्थी प्रतिवेदनार्थ स्पष्ट उल्लेख करण्याची पध्दती ठेवावी म्हणजे एक पुर्ततेसाठी प्रकरणाची आवक-जावक कमी होऊन ते सत्वर निर्णयीत होणे शक्य होईल.

सही/-
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि
अभिलेख [महा. राज्य] पुणें, यांचेकरिता

का.प्र. वर मा.ज.आ. ]
पुणें, यांची स्वाक्षरी ]
असे. ]